| MHJG190008292022 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | – | ०९/११/२०२२ |
| | नोंदणी दिनांक | – | ०९/११/२०२२ |
| | निकाल दिनांक | – | ०५/०५/२०२५ |
| | कालावधी | – | व. म. दि. |
| | | | ०२ ०५ २६ |

| | |
|---|---|
| | **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पारोळा, ता. पारोळा, जि. जळगांव**<br>**यांच्या न्यायालयात**<br>**(पिठासीन न्यायाधीश एम. एस. काझी)**<br>**(घोषीत दि. ०५/०५/२०२५)**<br>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १७६/२०२२**<br>**(सी.एन.आर. – एम.एच.जे.जी.१९ – ०००८२९ – २०२२)**<br>**नि.क्र. ६०** |
| | गु.नों. क्र. ४०६/२०२१,<br>पोलीस ठाणे, पारोळा, ता. पारोळा, जि. जळगांव. |
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलीस ठाणे, पारोळा, ता. पारोळा, जि. जळगाव. |
| सरकारतर्फे | सहाय्यक सरकारी अभियोक्ता, श्रीमती. पी.बी. मगर. |
| आरोपी | शुभम पुंजु पाटील,<br>वय– २८ वर्ष, कामधंदा– शिक्षक,<br>रा. संत गुलाब बाबा नगर, पारोळा, ता. पारोळा, जि. जळगांव. |
| आरोपी तर्फे | विधिज्ञ श्री. एस. यु. मिसर. |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची दिनांक | दि. २०/१०/२०२१ |
| पहिली खबर दिनांक | दि. २०/१०/२०२१ |
| दोषारोपपत्राची दिनांक | दि. ०९/११/२०२२ |
| दोषारोप ठेवल्याची दिनांक | दि. १०/०३/२०२३ |

| | |
|---|---|
| पुरावा सुरु झाल्याची दिनांक | दि. १९/०३/२०२४ |
| न्यायनिर्णय दिनांक | दि. ०५/०५/२०२५ |

## आरोपींचा तपशिल

| आरोपींची श्रेणी | आरोपींची नांवे | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | सुनावणी दरम्यान तुरुंगामध्ये असल्याचा कालावधी कलम ४४८ (१) सीआरपीसी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शुभम पुंजु पाटील, वय– २८ वर्ष, कामधंदा– शिक्षक, रा. संत गुलाब बाबा नगर, पारोळा, ता. पारोळा, जि. जळगांव. | २३/११/२१ | ०९/११/२२ | भा.दं.वि. कलम २७९, ३०४(अ), ३३७, ३३८ आणि मो.वा.का. कलम १८४ प्रमाणे | निर्दोष मुक्त केले | –– | –– |

## अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी/बचाव/न्यायालयाचे साक्षीदार

### अ) अभियोग पक्ष

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| १. | सुनंदा संजय मोरे | फिर्यादी |
| २. | संजय जुलाल मोरे | साक्षीदार |

### ब) बचाव साक्षीदार

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| –– | –– | –– |

क) न्यायालयीन साक्षीदार

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| -- | -- | -- |

अभियोगपक्षाची निशाणी क्रमांक/बचाव पक्षाची निशाणी क्रमांक/न्यायालयाची निशाणी क्रमांक

अ) अभियोग पक्ष निशाणी क्रमांक –

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | ५३ | फिर्याद |

ब) बचाव पक्ष निशाणी क्रमांक –

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | -- | -- |

क) न्यायालयीन निशाणी क्रमांक –

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | -- | -- |

ड) मुद्देमाल –

| अनु.क्र. | मुद्देमाल क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | -- | -- |

## न्यायनिर्णय

## (दि. ०५/०५/२०२५)

१. प्रस्तुत खटला आरोपीचे विरुध्द त्यांनी भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३०४(अ), ३३७, ३३८ आणि मोटर वाहन अधिनियमाचे कलम १८४ प्रमाणे गुन्हा केल्याबाबत दाखल करण्यात आलेला आहे.

२. अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :-

दिनांक २०/१०/२०२१ रोजी दुपारी ०३.३० वाजेच्या सुमारास मौजे शिवरे गावाच्या पुढे १ कि.मी. अंतरावर, ता. पारोळा, जि. जळगांव येथील शिवरे गावाकडुन तरवाडे गावाकडे जातांना सुकदेव माणीक बागुल यांच्या शेताजवळ आरोपीने त्याच्या ताब्यातील होंडा कंपनीची मोटारसायकल नोंदणी क्र. एम.एच. १९ डी.जे. २८७४ हे वाहन मानवी जिवीत धोक्यात येईल किंवा अन्य व्यक्तीला दुखापत किंवा नुकसान पोहोचण्याचा संभव आहे, इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालविले, तसेच आरोपीने सदर वाहन अविचाराने व हयगयीने भरधाव वेगात व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन व निष्काळजीपणे चालवुन समोरुन येणारे फिर्यादी यांचे चुलत मामा यांच्या ताब्यातील वाहन हिरो कंपनीची एच एफ डिलक्स मोटारसायकल नोंदणी क्र. एम.एच. ४५ डब्ल्यु ४४४१ या वाहनास जोराची धडक दिली व त्यामुळे सदर वाहनावर मागील आसनावर बसलेले फिर्यादी यांचे वडील नामे हिलाल वाघ यांच्या डोक्यास गंभिर दुखापत होवुन ते मयत झाले, तसेच आरोपीने उपरोक्त वाहन अविचाराने व हयगयीने भरधाव वेगात व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन व निष्काळजीपणे चालवुन समोरुन येणारे फिर्यादी यांचे चुलत मामा यांच्या ताब्यातील वाहन हिरो कंपनीची एच एफ डिलक्स मोटारसायकल नोंदणी क्र. एम.एच. ४५ डब्ल्यु ४४४१ या वाहनास जोराची धडक दिली व त्यामुळे सदर वाहन चालक प्रकाश सोनवणे व त्या वाहनाच्या मागच्या आसनावर बसलेले फिर्यादी यांचे वडील नामे हिलाल वाघ यांना जखमी केले, तसेच आरोपीने त्याच्या ताब्यातील होंडा कंपनीची मोटारसायकल नोंदणी क्र. एम.एच. १९ डी.जे. २८७४ हे वाहन अविचाराने व हयगयीने भरधाव वेगात व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन व निष्काळजीपणे चालवुन समोरुन येणारे फिर्यादी यांचे चुलत मामा यांच्या ताब्यातील वाहन हिरो कंपनीची एच एफ डिलक्स मोटारसायकल नोंदणी क्र. एम.एच. ४५ डब्ल्यु ४४४१ या वाहनास जोराची धडक दिली व त्यामुळे सदर वाहन चालक प्रकाश सोनवणे व त्या वाहनाच्या मागच्या आसनावर बसलेले फिर्यादी यांचे वडील नामे हिलाल वाघ यांना गंभीर दुखापत केली,

तसेच आरोपीने त्याच्या ताब्यातील होंडा कंपनीची मोटारसायकल नोंदणी क्र. एम.एच. १९ डी.जे. २८७४ हे वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन इतरांची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे वेगात चालविले. त्यानंतर फिर्यादी यांनी आरोपी विरुध्द प्रस्तुत खटल्यातील फिर्याद पोलीस ठाणे, पारोळा येथे दाखल केली आहे. त्यानुसार आरोपी विरुध्द गु.नों. क्र. ४०६/२०२१ हा पोलीस ठाणे, पारोळा येथे भारतीय दंड विधान कलम २७९, ३०४(अ), ३३७, ३३८ आणि मोटर वाहन अधिनियमाचे कलम १८४ अन्वये दाखल करण्यात आला.

३. आरोपी यांचे विरुध्द नि.क्र. ११ वर दोषारोप ठेवण्यात आला. आरोपी यांनी दोषारोपातील दोष अमान्य केल्यामुळे प्रस्तुत खटला पुढे चालविण्यात आला.

४. आरोपी विरुध्द गुन्हादर्शक पुरावा मिळुन आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ प्रमाणे आरोपीचे निवेदन नि.क्र. ५७ येथे नोंदविण्यात आले.

५. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती. पी.बी. मगर व आरोपी यांचे तर्फे विधीज्ञ एस. यु. मिसर यांचा युक्तीवाद ऐकला.

६. अभियोग पक्षाचा खटला व अभिलेखावरील पुरावा विचारात घेता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात, त्यांचे निष्कर्ष व कारणमिमांसा मी पुढील प्रमाणे देत आहे –

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | दिनांक २०/१०/२०२१ रोजी दुपारी ०३.३० वाजेच्या सुमारास मौजे शिवरे गावाच्या पुढे १ कि.मी. अंतरावर, ता. पारोळा, जि. जळगांव येथील शिवरे गावाकडुन तरवाडे गावाकडे जातांना सुकदेव | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | माणीक बागुल यांच्या शेताजवळ आरोपीने त्याच्या ताब्यातील होंडा कंपनीची मोटारसायकल नोंदणी क्र. एम.एच. १९ डी.जे. २८७४ हे वाहन मानवी जिवीत धोक्यात येईल किंवा अन्य व्यक्तीला दुखापत किंवा नुकसान पोहोचण्याचा संभव आहे, इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालविले आणि त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड विधानाचे कलम २७९ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | |
| २. | वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील होंडा कंपनीची मोटारसायकल नोंदणी क्र. एम.एच. १९ डी.जे. २८७४ हे वाहन अविचाराने व हयगयीने भरधाव वेगात व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन व निष्काळजीपणे चालवुन समोरुन येणारे फिर्यादी यांचे चुलत मामा यांच्या ताब्यातील वाहन हिरो कंपनीची एच एफ डिलक्स मोटारसायकल नोंदणी क्र. एम.एच. ४५ डब्ल्यु ४४४१ या वाहनास जोराची धडक दिली व त्यामुळे सदर वाहनावर मागील आसनावर बसलेले फिर्यादी यांचे वडील नामे हिलाल वाघ यांच्या डोक्यास गंभिर दुखापत होवुन ते मयत झाले, जो की, सदोष मनुष्यवध होत नाही, अशा प्रकारे आरोपी त्याच्या मरणास कारणीभुत झाला आणि त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड विधानाचे कलम ३०४ (अ) अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | **नकारार्थी** |
| ३. | वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील होंडा कंपनीची मोटारसायकल नोंदणी क्र. एम.एच. १९ डी.जे. २८७४ हे वाहन अविचाराने व हयगयीने भरधाव वेगात व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन व निष्काळजीपणे चालवुन | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | समोरुन येणारे फिर्यादी यांचे चुलत मामा यांच्या ताब्यातील वाहन हिरो कंपनीची एच एफ डिलक्स मोटारसायकल नोंदणी क्र. एम.एच. ४५ डब्ल्यु ४४४१ या वाहनास जोराची धडक दिली व त्यामुळे सदर वाहन चालक प्रकाश सोनवणे व त्या वाहनाच्या मागच्या आसनावर बसलेले फिर्यादी यांचे वडील नामे हिलाल वाघ यांना जखमी केले आणि त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड विधानाचे कलम ३३७ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | |
| ४. | वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील होंडा कंपनीची मोटारसायकल नोंदणी क्र. एम.एच. १९ डी.जे. २८७४ हे वाहन अविचाराने व हयगयीने भरधाव वेगात व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन व निष्काळजीपणे चालवुन समोरुन येणारे फिर्यादी यांचे चुलत मामा यांच्या ताब्यातील वाहन हिरो कंपनीची एच एफ डिलक्स मोटारसायकल नोंदणी क्र. एम.एच. ४५ डब्ल्यु ४४४१ या वाहनास जोराची धडक दिली व त्यामुळे सदर वाहन चालक प्रकाश सोनवणे व त्या वाहनाच्या मागच्या आसनावर बसलेले फिर्यादी यांचे वडील नामे हिलाल वाघ यांना गंभीर दुखापत केली आणि त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड विधानाचे कलम ३३८ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | **नकारार्थी** |
| ५. | वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील होंडा कंपनीची मोटारसायकल नोंदणी क्र. एम.एच. १९ डी.जे. २८७४ हे वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन इतरांची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे वेगात | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | चालविले आणि त्याद्वारे आरोपीने मोटार वाहन अधिनियमाचे कलम १८४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | |
| ६. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**कारणमिमांसा**

७. अभियोगपक्षातर्फे प्रस्तूतचा गुन्हा सिध्द करण्यासाठी एकुण दोन साक्षीदार तपासण्यात आलेले आहेत, त्यांचा तपशील खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | सुनंदा संजय मोरे | (नि.क्र. ११) |
| २. | संजय जुलाल मोरे | (नि.क्र. ११) |

**मुद्दे क्र. १ ते ५ करीता –**

८. सदर मुद्दे हे एकत्रीतरित्या नोंदवून त्याची कारणमिमांसा खालीलप्रमाणे देत आहे.

९. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ – सुनंदा संजय मोरे – फिर्यादी यांनी त्यांच्या सरतपासात असे कथन केले आहे की, घटना सन २०२१ मध्ये घडली. त्यांचे वडील नामे हिलाल सुकदेव वाघ हे दि. १८/१०/२०२१ रोजी त्यांच्या घरी आले होते. त्यांचे वडील त्यांच्या मामासोबत दुचाकी वाहनावर मुंदाणे गावाकडे निघाले. त्यावेळी सुकदेव बागुल यांच्या शेताजवळ त्यांचा अपघात झाला. त्यावेळी आरोपी शुभम पुंजु पाटील यांच्या मोटारसायकलने

अपघात झाला. अपघातामध्ये त्यांचे वडील तेथे खाली पडले, त्यांना दुरध्वनी आला, ते त्या ठिकाणी गेले, त्यावेळी त्यांचे वडील बेशुध्द होते. त्यांनी त्यांच्या वडीलांनी कुटीर रुगणालय, पारोळा येथे उपचारासाठी आणले, त्या ठिकाणी ते मयत झाल्याचे त्यांना कळाले. त्या अपघातामध्ये त्यांचे मामा प्रकाश सोनवणे यांना देखील त्यांच्या पायाला व डोक्याला मार लागला होता. सदरचा अपघात हा आरोपीच्या चुकीमुळे झाला होता. ते आरोपी शुभम यास खुप वर्ष झाल्यामुळे ओळखु शकत नाही. तो आज रोजी न्यायालयात हजर नाही असे सांगितले. (आरोपी न्यायालयात हजर असुन साक्षीदाराने त्यास ओळखले नाही). त्यानंतर त्यांनी सदर घटनेसंदर्भात फिर्याद दिली. त्यांना त्यांची फिर्याद दाखविण्यात आली, त्यावर त्यांचा अंगठा असुन त्यातील मजकुर बरोबर आहे, फिर्यादला **<u>नि.क्र. ५३</u>** देण्यात आली.

१०. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ – सुनंदा संजय मोरे – फिर्यादी यांनी त्यांच्या उलटतपासात हे मान्य केले आहे की, त्यांनी घटना प्रत्यक्ष पाहिलेली नाही, त्यांनी ऐकिव माहितीच्या आधारे फिर्याद दिली आहे.

११. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ – संजय जुलाल मोरे यांनी त्यांच्या सरतपासात असे कथन केले आहे की, घटना दि. २०/१०/२०२१ रोजी घडली. घटनेच्या दिवशी त्यांचे माम प्रकाश रमेश सोनवणे व त्यांचे सासरे हे त्यांच्याकडे आले होते, त्यानंतर ते दोघे एका मोटारसायकलने नंदाळे गांवी जाण्यासाठी निघाले असता तरवाडे गावाजवळ सुकदेव बागुल यांच्या शेताजवळ त्यांचा अपघात झाला. सदरचा अपघात हा एका मोटारसायकलच्या धडकेमुळे झाला. त्यामुळे त्यांचे सासरे जागीच बेशुध्द झाले आणि त्यांचे मामा–सासरे प्रकाश यांना डोक्याला लागले होते. सदरचा अपघात हा युनीकॉर्न वाहन चालकाच्या चुकीमुळे झाला होता. सदर वाहन चालकाचे नांव शुभम पुंजु पाटील हे होते. ते शुभम यास ओळखत नसल्याचे त्यांनी सांगितले.

१२. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ – संजय जुलाल मोरे यांनी त्यांच्या उलटतपासात

हे मान्य केले आहे की, घटना त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेली नाही, त्यामुळे घटना कशी व काय घडली हे त्यांना सांगता येणार नाही, ज्यावेळी घटना घडली तेव्हा ते त्यांच्या घरी होते. पुढे त्यांनी हे देखील मान्य केले आहे की, ते ऐकिव माहितीच्या आधारे न्यायालयात साक्ष देत आहेत. पुढे त्यांनी हे देखील मान्य केले आहे की, पोलीसांनी त्यांचा जबाब नोंदवुन घेतला नव्हता.

१३.	आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता त्यांच्याकडुन झालेला अपघात, त्यांच्या निष्काळजीपणाने व भरधाव वेगाने वाहन चालवीले, हे सिध्द होणे महत्वाचे आहे, परंतु असा कोणताही पुरावा शंकेच्या पलीकडे जावुन अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात आला नाही, ज्याच्याने धडक देणारे वाहन हे आरोपीच चालवत होता व तो निष्काळजीपणाने सदरचे वाहन चालवत होता, असे सिध्द झाले नाही, तसेच फिर्यादी यांचे चुलत मामा यांच्या ताब्यातील वाहन हिरो कंपनीची एच एफ डिलक्स मोटारसायकल नोंदणी क्र. एम.एच. ४५ डब्ल्यु ४४४१ या वाहनास जोराची धडक दिली व त्यामुळे सदर वाहनावर मागील आसनावर बसलेले फिर्यादी यांचे वडील नामे हिलाल वाघ यांच्या डोक्यास गंभिर दुखापत होवुन ते मयत झाले, असे सिध्द झाले नाही. तसेच सदर वाहन चालक प्रकाश सोनवणे व त्या वाहनाच्या मागच्या आसनावर बसलेले फिर्यादी यांचे वडील नामे हिलाल वाघ यांना गंभीर दुखापत केल्याचे सिध्द झाले नाही. अभियोग पक्ष एकाही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासु शकले नाही. दिलेल्या फक्त परिस्थितीजन्य पुराव्यावरुन आरोपीला दोषी ठरवीणे, हे आजिबात न्यायोचित होणार नाही. त्यामुळे फिर्याद ही शंकेच्या पलीकडे जावुन सिध्द झालेली नाही व सदर साक्षीदारांचे व्यतिरीक्त अभियोग पक्षास मदत करणारे इतर कोणतेही साक्षीदार तपासण्यात आलेले नाहीत. या परिस्थीतीचा विचार करता, आरोपी विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषसिध्दीसाठी पुरावा आलेला नाही. आरोपीला दोषी ठरविण्याइतपत कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर न आल्याने आरोपीवर ठेवण्यात आलेले दोष सिध्द होत नाहीत. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. म्हणून मी मुद्दे क्र. १ ते ५ यांचे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. ६ याच्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे –

## आदेश

१. आरोपी नामे शुभम पुंजु पाटील यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५ (१) अन्वये भारतीय दंड विधान कलम २७९, ३०४(अ), ३३७, ३३८ आणि मोटर वाहन अधिनियमाचे कलम १८४ या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ च्या पुर्ततेसाठी आरोपीने रुपये १५,०००/– रक्कमेचा जामीन द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर केला).

(एम. एस. काझी)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पारोळा,
ता. पारोळा, जि. जळगांव.

दिनांक – ०५/०५/२०२५.